पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी १८
माहिती व तंत्रज्ञान विभाग
क्र.- मातंवि/१३/कावि/१३८/२०१६
दिनांक - १६/०६/२०१६

**परिपत्रक**

**विषय – विविध संगणक प्रणालीसाठी संबंधित अधिकारी/कर्मचा-यांना देण्यात आलेले User Name व Passward सेवानिवृत होत असतांना निरस्त करुन घेणेबाबत**

**संदर्भ – इकडील परिपत्रक क्र.मातंवि/८/कावि/३७१/२०१५ दिनांक ०९/११/२०१५**

महानगरपालिकेचे बहुतांशी दैनंदिन कामकाज हे e-governance प्रकल्पांतर्गत संगणकीकृत झाले असुन त्यासाठी प्रत्येक विभागाचे कामकाजाचेदृष्टीने संगणक प्रणाली तयार करण्यात आलेली आहे. सदर संगणक प्रणालीद्वारे कामकाज करण्यासाठी संबंधित प्रत्येक अधिकारी/कर्मचारी यांना त्यांचे role नुसार Username व Password देणेत आलेले आहेत. सदर देण्यात आलेल्या Username व Password वापरुन करणेत आलेल्या कामकाजास संबंधित अधिकारी/कर्मचारी जबाबदार असल्याने संबंधितांनी आपले Password कोणत्याही दुस-या कर्मचा-यास / नागरिकांस देऊ नयेत व ते वेळोवेळी बदलण्याची दक्षता घेणेबाबत उपरोक्त संदर्भिय परिपत्रकान्वये यापुर्वीच कळविण्यात आले आहे. तसेच अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होत असतांना त्यांचे login निरस्त करणे आवश्यक आहे.

तरी या परिपत्रकान्वये सर्व अधिकारी/कर्मचा-यांना कळविण्यात येते की अधिकारी/कर्मचारी सेवानिवृत्त होत असतांना त्यांनी स्वतः /पत्रादवारे/ई-मेलद्वारे माहिती व तंत्रज्ञान विभागाशी संपर्क साधुन आपल्या टेबल अथवा कामकाजासंबंधीत विविध प्रणालींसाठी देणेत आलेले Login निरस्त करुन घेणेची दक्षता घ्यावी. अन्यथा आपले User Name व password वापरुन आर्थिक बाबींमध्ये अथवा अधिकृत माहितीमध्ये बदल करणेसारखे काही गैरवापर झाल्याचे आढळुन आल्यास त्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना जबाबदार धरणेत येईल याची नोंद घ्यावी.

विभाग प्रमुखांनी सदरचे परिपत्रक सर्व अधिकारी/कर्मचारी यांचे निदर्शनास आणुन द्यावे व password protection बाबत तसेच सेवानिवृत्त होत असतांना login निरस्त करुन घेणेबाबतची दक्षता घ्यावी.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११०१८.